२४९०
आवक क्रमांक
दिनांक 1 AUG 2003

लोकशाहिर अण्णाभाऊ साठे पुरस्कार योजना.
नियमावली

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक -असापु-२०००/प्र.क्र.२३०/मावक ४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक :- २५ जुलै, २००३.

**वाचा** :- १) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय, क्रमांक : बीसीएच १०९७/प्र.क्र.२३६/मावक ४, दिनांक २९ जुलै ९७
२) संचालकांचे पत्र क्रमांक मावक/अ.साठे पुरस्कार/नियमावली/००-०१/का१२/८५५, दिनांक २५.८.२०००
३) संचालकांचे पत्र क्रमांक मावक/अ.साठे पुरस्कार/पु.भा./००-०१/का१२/९४७, दिनांक २.२.२००१

**शासन निर्णय** :- राज्यातील मातंग समाजातील कलावंत,साहित्यिक व समाजसेवक यांना लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या नावे लोकशाहिर अण्णाभाऊ साठे पुरस्कार देण्याची योजना सन १९९७-९८ पासून सुरु करण्यात आली आहे. सदर योजना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार योजनेच्या धर्तीवरच आहे. त्याच आधारे लोकशाहिर अण्णाभाऊ साठे पुरस्कार या योजनेची नियमावली तयार करण्याबद्दलचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर विचार करुन सोबतच्या परिशिष्ट "अ, ब, क" मध्ये नमूद केलेल्या नियमावलीस शासन मान्यता देत आहे.

२. सदर खर्च हा "२२२५-अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण -०१ मागासवर्गीयांचे कल्याण,८०० इतर खर्च मागासवर्गीयांचे कल्याण (एक)(ए) स्वयंसेवी संस्थांना अनुदाने (२२२५ ०९९ ६)" मागणी क्रमांक एन-४ या लेखाशीर्षाखालील चालू वर्षाच्या आर्थिक तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग, गृह विभाग (परिवहन), सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४९०/०२/ व्यय १४, दिनांक २४.४.२००२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना.ना.मडीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा)मुंबई/नागपूर.

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
जिल्हा कोषागाराधिकारी, पुणे जि. पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग
महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग
निवड नस्ती- मावक ४

शासन निर्णय क्रमांक -असांपु-२०००/प्र.क्र.२३०/मावक ४, दिनांक २५ जुलै, २००३ चे सहपत्र

विवरणपत्र "अ"

मातंग समाजाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या विकास होण्यासाठी सामाजिक कलात्मक व साहित्यिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कलावंत, साहित्यिक व समाज सेवकांना/ संस्थांना "अण्णाभाऊ साठे पुरस्कार" हया राज्य पुरस्कारासाठी नियम...

| | | |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त शीर्षक | हया नियमांना मातंग समाजातील सामाजिक, कलात्मक व साहित्यिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामासाठी लोकशाहिर अण्णाभाऊ साठे पुरस्कार नियम असे संबोधण्यात यावे. हे नियम राज्यातील सर्व जिल्हयांसाठी लागू राहतील. |
| २ | उद्दिष्ट | मातंग समाजातील सामाजिक, कलात्मक व साहित्यिक क्षेत्रात काम करीत असलेल्या व्यक्तींच्या कामाची दाद घ्यावी व इतरांना त्यापासून प्रेरणा मिळावी जेणेकरुन या समाजातील समाज सेवक, कलावंत व साहित्यिक सरसावून पुढे यावेत. |
| ३ | सामाजिक कार्याचे स्वरुप | या योजनेनुसार मातंग समाजाकरीता सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या कल्याणासाठी झटणारे नामवंत समाजसेवक, कलावंत व साहित्यिक तसेच सामाजिक संस्था असाव्यात. |
| ४ | पुरस्कार | पुरस्कार पुढील प्रमाणे राहतील :-<br>***समाजसेवक, कलावंत व साहित्यिकांसाठी :-**<br>१) शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र ,स्मृतिचिन्ह<br>२) रु.१५,०००/-रोख रक्कम (रु. पंधरा हजार फक्त)<br>३) एक शाल किंवा साडी खण आणि श्रीफळ<br>***सामाजिक संस्थांसाठी :-**<br>१) शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र<br>२) स्मृतिचिन्ह ज्यावर संस्थेचे नाव असेल<br>३) रु.२५,०००/- रोख रक्कम (रु.पंचवीस हजार फक्त)<br>४) शाल व श्रीफळ |
| ५ | पात्रता | *** समाजसेवक, कलावंत व साहित्यिकांसाठी:-**<br>१) या योजनेनुसार मातंग समाजाकरीता समाजकल्याण आणि कलात्मक साहित्यिक क्षेत्रात कार्य तथा कल्याणासाठी झटणारे नामवंत, कलावंत, साहित्यिक व समाजसेवक असावेत. |

२) समाजकल्याण, कलावंत व साहित्यिक क्षेत्रात कमीत कमी दहा (१०) वर्षे कार्य केलेले असावे.

३) पुरुषाचे वय ५० वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त व स्त्रियांचे वय ४० वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त असावे.

४) कोणत्याही व्यक्तीस/ संस्थेस एकापेक्षा अधिक वेळा पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

५) सदर पुरस्कार मिळणयास फक्त मातंग समाजातील समाजसेवक, कलावंत व साहित्यिक यांचा विचार केला जाईल.

६) पुरस्कार मिळण्यासाठी पात्रता व्यक्तीगत मौलिक कार्यावरुन ठरविण्यात येईल. समाजातील त्यांच्या पदाचा याबाबतीत विचार करण्यात येणार नाही. वरील क्षेत्रात कमीत कमी १० वर्षे वैयक्तिक अभिजात कार्य करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था या पुरस्कारास पात्र आहेत.

***सामाजिक संस्थांसाठी :-**

१) समाजकल्याण क्षेत्रात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्याय निर्मुलन, अंधश्रध्दा रुढी निर्मुलन, जनजागरण इ. क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना हा पुरस्कार दिला जाईल.

२) स्वयंसेवी संस्था पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० वा सोसायटी रजिस्टर ॲक्ट नुसार पंजीबध्द असावी.

३) स्वयंसेवी संस्थेचे वरील क्रमांक १ मध्ये दर्शविलेले समाजकल्याण क्षेत्रातील सेवा व कार्य १० वर्षाहून अधिक असावे. विशेष मौलिक व भरीव काम करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत अट अपवाद म्हणून शिथील करण्यात येईल.

४) स्वयंसेवी संस्था राजकारणापासून अलिप्त असावी. तसेच तीचे कार्य व सेवा ही पक्षातीत व राजकारणापासून स्वतंत्र व अलिप्त असावी.

५) मातंग समाजसेवा आणि समाजाचा विकास या क्षेत्रातील कामाचा विचार करुनच हा पुरस्कार स्वयंसेवी संस्थांना दिला जाईल.

| | | |
|---|---|---|
| ६ | पुरस्काराची संख्या | ***समाजसेवक, कलावंत व साहित्यिकांसाठी :-**<br>एकूण २५ (पंचवीस)पर्यंत पुरस्कार देण्यात येतील. त्यापैकी महिला ३० टक्क्यांपर्यंत असाव्यात.<br><br>***सामाजिक संस्थासाठी :-**<br>एकूण ६ (सहा) पुरस्कार देण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ७ | अर्जाच्या शिफारशी विषयी पध्दत व छाननी | ***समाजसेवक, कलावंत व साहित्यिकांसाठी** :- व्यक्तीगत<br>१) जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी त्यांचे जिल्हयातील मातंग समाजातील समाजसेवक, कलावंत व साहित्यिक यांचे विहित नमुन्यात अर्ज मागवून त्याची जिल्हास्तरावर आवश्यक बाबींची पडताळणी करुन ते जिल्हा दक्षता समिती समोर सादर करतील.<br>२) जिल्हा दक्षता समितीने प्राप्त झालेले अर्ज/शिफारशी /प्रस्ताव नियम व अटी नुसार तपासून त्यामधील फक्त २(दोन) व्यक्तींची शिफारस संचालक, समाजकल्याण यांचेकडे प्रस्तावासह करतील.<br>३) शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांनी/ जिल्हा दक्षता समितीने त्यांच्या शिफारशी बरोबर पढील कागदपत्रे संचालक,समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवतील.<br>अ) शिफारस केलेले संपूर्ण जीवन चरित्र<br>ब) बिना दुराचार प्रमाणपत्र<br>क) गैरवर्तनासंबंधी खटला किंवा शिक्षा झाली नसल्याचे प्रमाणपत्र तसेच सार्वजनिक संपत्तीचा अपहार केला नसल्याचे प्रमाणपत्र<br>ड) व्यक्तीने संपादित केलेले यश किंवा उत्कृष्ट कार्य<br>इ) शिफारस करण्यात येणाऱ्या व्यक्तीने समाजसेवक, कलात्मक व साहित्यिक क्षेत्रात केलेल्या कामासंबंधी पुरावा तथा तत्संबंधी आवश्यक कागदपत्र, प्रसिध्दी इ-<br>ई) पासपोर्ट आकाराचे व्यक्तीचे छायाचित्र (तीन प्रती)<br>उ) संचालक, स.क.,म.रा.,पुणे यांचेकडे किंवा शासनाकडे तथा अन्य मार्गाने आलेले वैयक्तिक अर्ज/प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.<br>ऊ) अपूर्ण शिफारशी विचारात घेतल्या जाणार नाहीत.<br><br>***सामाजिक संस्थांसाठी** :-<br>अ) विभागीय समाजकल्याण अधिकारी हे आपल्या विभागातील एकूण ४ (चार) संस्था (उपरोक्त क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था) ची शिफारस संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे करतील.<br>ब) विभागीय समाजकल्याण अधिकारी हे शिफारस करताना खालील कागदपत्रे तपासून ती संचालकांना सादर करतील.<br>क) संस्था पब्लिक ट्रस्ट ॲक्ट व/ वा सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० खाली पंजीबध्द असल्याचे प्रमाणपत्र<br>ड) संस्थेच्या आर्थिक व्यवहारात कोणताही गैरव्यवहार नसल्याचे प्रमाणपत्र व संस्थेचे कार्य पक्षातील व राजकारणापासून अलिप्त असल्याबाबत प्रमाणपत्र. |

| | | |
|---|---|---|
| | | इ) संस्थेच्या कार्यासंबंधी माहिती व तत्संबंधी कागदपत्र तसेच संस्था कोणते भरीव कार्य करते व आत्तापर्यंत संस्थेने त्यांचे उद्दिष्ट कितपत साध्य केले आहे यासंबंधी अहवाल<br>ई) संस्थांच्या घटनेची प्रमाणित प्रत व मागील ५ वर्षांचे वार्षिक अहवाल. |
| ८ | आलेल्या शिफारशींची छाननी | जिल्हा दक्षता समितीने व विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी केलेल्या शिफारशींनुसार अर्ज/ प्रस्ताव शिफारस/ पुस्तिकेच्या रुपात एकत्र करुन शासनाकडे विचारासाठी पाठवितील. |
| ९ | पुरस्कार जाहिर करणारे प्राधिकारी | संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आलेल्या एकत्रित शिफारशी/ प्रस्ताव यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीसमोर ठेवण्यात येतील. |
| १० | शासनाची मान्यता | १. प्राप्त शिफारशी/ प्रस्ताव शासन नियुक्त समितीकडून विचारात घेतले जातील व तपासले जातील आणि समितीच्या अंतीम शिफारशी शासनाकडे (समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग) मान्यतेसाठी पाठविले जातील. संशयास्पद प्रकरणी सुध्दा समितीच्या निर्णयाला शासनाची मान्यता घ्यावी लागेल. शासनाच्या मान्यतेनंतर पुरस्कार जाहिर केला जाईल.<br>२. शासनाची मान्यता अंतीम राहील आणि त्याविरुध्द अपिल करता येणार नाही. |
| ११ | पुरस्काराचे वितरण | विशेष सार्वजनिक समारंभात शासनाने निश्चित केलेल्या ठिकाणी केंद्रीय मंत्री/ राज्यपाल/ मुख्यमंत्री/ मंत्री/ प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाईल आणि सन्मानपत्रावर विभागाचे मंत्री व विभागाचे सचिव यांच्या स्वाक्षऱ्या असतील. पुरस्कारास निवड झालेल्या व्यक्तीचे निधन झाले असेल तर त्यांच्या/ तिच्या वारसाचा शासनाच्या पूर्वपरवानगीने पुरस्कार घेण्यासाठी बोलाविले जाईल. पुरस्कार मिळालेल्या व्यक्तीला हा पुरस्कार व्यक्तीशः दिला जाईल व संस्थेतर्फे हा पुरस्कार अध्यक्ष, उपाध्यक्ष अथवा संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला देण्यात येईल. |
| १२ | समारंभाचा दिवस | प्रतिवर्षी दिनांक १ ऑगस्ट |
| १३ | खर्च | पुरस्कार वितरण समारंभ, देयके आणि इतर आकस्मिक खर्च इ. करिता होणारा खर्च समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संचालक, समाजकल्याण, म.रा.पुणे यांच्या अधिनस्त ठेवलेल्या मंजूर तरतूदीतून भागवावा. आणि त्यासाठी सोबत जोडलेली विवरणपत्र "ब" मधील कार्यपध्दती अवलंबवी. |

शासन निर्णय क्र.असापु २०००/प्र.क्र.२३८/मावक-४, दिनांक २५ जुलै, २००३ चे सहपत्र.

विवरणपत्र - ब

अण्णाभाऊ साठे राज्य पुरस्कार समारंभासाठी खर्चाची पध्दती.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १. | पुरस्कार विजेत्यास रोख बक्षिस. | रु.१५,०००/- (रुपये पंधरा हजार ) प्रत्येक पुरस्कार विजेत्यास.<br>रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार ) प्रत्येक संस्थेस. |
| २. | पुरस्कार विजेत्यास प्रवास भत्ता. | १. पुरस्कार विजेत्याच्या निवासस्थानापासून समारंभाच्या ठिकाणापर्यन्त आणि परतीचे रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे प्रवासभाडे किंवा इतर सार्वजनिक वाहनांचे / एस.टी. बसेसचे प्रत्यक्ष भाडे पुरस्कार विजेत्या आणि त्याची पत्नी / पती या दोघांना दिला जाईल.<br>२. स्वयंसेवी संस्था पुरस्कार प्राप्त करणाऱ्या संस्थेचेअध्यक्ष वा उपाध्यक्ष वा संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला संस्थेच्या ठिकाणा पासून समारंभाच्या स्थळापर्यन्त रेल्वेचे पहिल्या वर्गाचे जाण्या-येण्याचे भाडे किंवा एस.टी.बसचे भाडे. |
| ३. | इतर सवलती | पुरस्कार विजेता आणि त्याची पत्नी किंवा तिचा पती संस्थेचा प्रतिनिधी हे पुरस्कार देण्याच्या ठिकाणी तीन दिवसापर्यन्त शासनाचे पाहुणे राहतील. पहिल्या दिवशी पुरस्कारार्थीचे आगमन व त्यांचे स्वागत करणे, दुसऱ्या दिवशी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करणे व तिसऱ्या दिवशी पुरस्कारार्थ्यांना प्रेक्षणीय स्थळे दाखविण्याचा कार्यक्रम आयोजित करणे आणि त्यांच्या निवास, भोजन, प्रवासभत्ता आणि स्थानिक वाहतूक खर्च शासनाकडून केला जाईल. शासनाने ठरविलेल्या दरानुसार राज्य पातळीवरील समितीच्या अशासकीय सभासदांना देण्यात येणाऱ्या प्रवासभत्त्या प्रमाणेच पुरस्कार विजेता आणि त्याची पत्नी / तिचा पती / संस्थेचे प्रतिनिधी प्रवासभत्त्यास पात्र समजले जातील.<br>पुरस्कार प्राप्त व्यक्तिंना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून घोषित करण्यात येईल, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे मोफत प्रवासाची सवलत देण्यात येईल आणि शासकीय विश्रामगृहात सवलतीच्या दराने उचित प्राधान्यक्रम देऊन आरक्षण देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ४. | सन्मानपत्र, शाल, साडीखण इ.देणे. | पुरस्कार विजेत्यास / संस्थेस सन्मानपत्र शाल किंवा साडीखण (ब्लाऊजचे कापड) एक श्रीफळ (नारळ) आणि पुरस्कार विजेत्याच्या पत्नीस किंवा पतीस एक श्रीफळ. |
| ५. | इतर संकीर्ण आणि आकस्मिक खर्च. | स्वयंसेवी संस्था पुरस्कार मिळविलेल्या संस्थेतर्फे पुरस्कार स्विकारणाऱ्या व्यक्तीस सन्मानपत्र स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ दिले जाईल. हस्त पुस्तिकेच्या छपाईसाठी आणि आमंत्रण पत्रिकेसाठी होणारा खर्च आणि इतर खर्च उदा.हॉलचे भाडे. स्टेज, फर्निचर, हार-गुच्छ, समुह छायाचित्र, साधन सामुग्री, कामगारआणि अल्पोपहार खर्च इ. योग्य तऱ्हेने करावा. |

***टिप :-*** संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. आणि यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजूरी देणे व ठरवून दिलेल्यानुसार खर्च करण्यासाठी त्यांना प्राधिकृत केले आहे व ते सन्मानपत्र, हस्तपुस्तिका आणि आमंत्रणपत्रिका शासकीय मुद्रणालयाकडून छापून घेतील.

---------

शासन निर्णय क्र.असापु २०००/प्र.क्र.२३८/मावक-४, दिनांक २५ जुलै, २००३ चे सहपत्र.

## विवरण पत्र "क"

### अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी खर्चाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| अ) | व्यक्ती व संस्थांवरील खर्च | |
| | १. पुरस्कारार्थी व्यक्तीस रोख पुरस्कार प्रत्येकी (२५ x रु.१५०००) | ३,७५,०००/- |
| | २. पुरस्कारार्थी संस्थेला रोख पुरस्कार ( ६ संस्था x रु. २५०००) | १,५०,०००/- |
| | ३. पुरस्कारार्थी व्यक्ती व संस्थांना वुलनची शाल/हिमरु शाल (३० x ४५०/- प्रमाणे) | ०,१३,५००/- |
| | ४. पुरस्कार प्राप्त व्यक्ती स्मृतिचिन्ह, सन्मानपत्रासह (२५ x रु.१८००/- प्रमाणे) | ०,४५,०००/- |
| | ५. पुरस्कारार्थी संस्थांना स्मृतिचिन्ह, सन्मानपत्रासह (५ x रु. २१००/-प्रमाणे) | ०,१०,५००/- |
| | ६. भोजन खर्च तीन दिवसांसाठी ; पुरस्कारार्थी (व्यक्ती- पती- पत्नीसह/संस्था २ प्रतिनिधी ) | ४०,०००/- |
| | एकूण | ६,३४,०००/- |
| ब) | समारंभाचा सामुहिक खर्च | |
| | १. प्रवास खर्च- सर्वांकरिता एकूण | ४५,०००/- |
| | २. पुरस्कारार्थी व्यक्ती व संस्था यांना शासकीय भोजन (३०० व्यक्तींना ) | ७५,०००/- |
| | ३. हॉलभाडे, रंगमंच, सजावट, हॉल सजावट इ. | ३५,०००/- |
| | ४. श्रीफळ, हार- गुच्छ इ. | २,५००/- |
| | ५. लक्झरी बस भाडे, सरकारी वाहनाचे पेट्रोल, प्रेक्षणीय स्थळांना भेटी, हार-तुरे, रेस्ट हाऊस भाडे किंवा हॉटेल्स, निवासभाडे खर्च | ४५,०००/- |
| | ६. पुरस्कारार्थ्यांना टॉवेल, साबण, टूथपेस्ट, कंगवा इ. | ४,०००/- |
| | एकूण | २,०६,५००/- |
| | एकूण 'अ व ब' | ८,४०,५००/- |

---

७७

समाज कल्याण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
आवक क्रमांक.......१६६२.........
दिनांक : २७/८/१०.........

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार**

**पुरस्काराच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन,**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : असापू- २००९/प्र.क्र.१०५ /मावक-७,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : - २२ जून, २०१०.

**वाचा :** १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : असापू २०००/प्र.क्र.२३० /मावक-४, दि. २५ जुलै, २००३.

२) संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचे अ. शा. पत्र क्र. सकसं/८६६, दि. ६.८. २००९.

**प्रस्तावना** :राज्यातील मातंग समाजातील कलावंत, साहित्यिक व समाज सेवक यांना तसेच त्या क्षेत्रातील सामाजिक संस्थांना, त्यांच्या कार्याची दखल घेऊन, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार देण्यात येतो. संदर्भातील अनुक्रमांक १ वरील दिनांक २५ जुलै, २००३ च्या आदेशान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्काराची रक्कम विहित करण्यात आलेली आहे. सदर पुरस्काराच्या रक्कमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :** संदर्भातील अनुक्रमांक १ वरील दिनांक २५ जुलै, २००३ च्या आदेशान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार योजनेची नियमावली विहित करण्यात आली आहे. या नियमावलीसोबतच्या विवरण पत्र-अ मधील अ.क्र.४ वरील पुरस्काराच्या रक्कमेत खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे..

| अ.क्र. | पुरस्कार | पुरस्काराची रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | प्रत्येक समाजसेवक, कलावंत व साहित्यिकांसाठी | २५,००० |
| २ | सामाजिक संस्थेसाठी | ५०,००० |

२. सदर बदल सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६७/व्यय-१४/१०, दि.३१.३.२०१० अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स. स. बेनके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा व अनुज्ञेयता) , मुंबई/ नागपूर.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
वित्त विभाग/ व्यय-१४, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती. मावक-७, सा. न्या. व वि. स. वि. मंत्रालय, मुंबई.

G R Mavak 7 C:\Kadam

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना "साहित्यरत्न"
या नावाने संबोधण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१३/प्र.क्र.२५२/समन्वय

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
तारीख: २७ सप्टेंबर, २०१३

प्रस्तावना :

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी सामाजिक असमानता, आर्थिक विषमता दूर करण्यासाठी जीवनभर कार्य केले तसेच आपल्या साहित्यातून ग्रामीण, श्रमजीवी व दलित जीवनांचे प्रतिबिंब उमटविले. त्यांनी कथासंग्रह, कांदबऱ्या, नाटके, पोवाडे, कथा लिहिलेल्या आहेत. तसेच माझा एशियन प्रवास हे आत्मचरित्र लिहिलेले आहे. त्यांच्या साहित्याचे इंग्रजी भाषेत तसेच इतर भाषेत भाषांतर झालेले असून त्यांचे साहित्य जगभरात पोहोचले आहे. अनेक विद्यापिठातुन त्यावर शोधनिबंध देखिल लिहिले गेले आहेत. त्यांच्या वैजयंता या कादंबरीवर काढलेल्या चित्रपटाला सर्टीफिकेट ऑफ मेरीट हे उत्कृष्ट मराठी चित्रपटाचे पारितोषिक मिळाले, त्यानंतर त्यांच्या माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वारणेचा वाघ, अलगुज आणि फकीरा या कादंब-यांवरही चित्रपट काढण्यात आले. अशा प्रकारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून श्रमजीवी, गोरगरीब जनतेची व्यथा मांडून साहित्य अजरामर केलेले आहे. त्यांचे साहित्यातील योगदान विचारात घेऊन त्यांना या पुढे राज्यशासनामार्फत साहित्यरत्न असे त्यांच्या नावापुढे संबोधण्यात यावे असा निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यातील योगदान विचारात घेऊन त्यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे असे यापुढे शासनामार्फत संबोधण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला असून, त्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००३१४४९२२१३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramhari Dagdu Shinde

Digitally signed by Ramhari Dagdu Shinde
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice &Spl Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramhari Dagdu Shinde
Date: 2013.10.03 14:55:30 +05'30'

(रा.द.शिंदे)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
६. सर्व मंत्रालयीन विभाग
७. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ,सचिवालय,विधानभवन,मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई
९. आयुक्त समाजकल्याण,पुणे
१०. आयुक्त,अपंग कल्याण, पुणे
११. संचालक,विजाभज व इमाव,पुणे
१२. सर्व महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक
१३. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण
१४. सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण
१५. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषद
१६. सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासने, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. सचिव (सामाजिक न्याय) यांचे स्वीय सहायक
१८. निवडनस्ती,समन्वय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार या पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः प्रसिद्धी- २०२५/प्र.क्र.०८ /समन्वय**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- ०४ मार्च, २०२५

वाचा:- १. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. दमिपु-२००१/ प्र.क्र.१८६/मावक-४ दि.२५.०७.२००१

२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. संरपु-२००४/ प्र.क्र.१८४/ मावक-४ दि.१६.०७.२००४

३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. दागापु-२००४/ प्र.क्र.५९/ मावक-१ दि.०७.०८.२००४

४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. असापु-२००१/ प्र.क्र.१०५/ मावक-७ दि.२२.०६.२०१०

प्रस्तावना:-

सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणुन दरवर्षी १) डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, २) संत रविदास पुरस्कार ३) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार ४) कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार असे पुरस्कार देण्यात येतात. सदर पुरस्कारांच्या रक्कमेत बऱ्याच कालावधीपासून वाढ करण्यात आलेली नसल्याने विविध लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संस्था यांचेकडून पुरस्काराच्या रक्कमेत वाढ करण्याची मागणी करण्यात येत होती त्यानुषंगाने सदर पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

१. सामाजिक न्याय विभागामार्फत विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सदर पुरस्कार रक्कमेत सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुरस्कारांबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या धोरणाचा अवलंब करणे आवश्यक राहिल.
३. सदर शासन निर्णय सन २०२४-२५ या वित्तीय वर्षापासून घोषित करण्यात येणाऱ्या पुरस्कारांना लागु राहिल.
४. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवण्यात यावा.
५. प्रस्तुत प्रकरणी आयुक्त समाज कल्याण, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.
६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ /विनियम/ भाग-२ ,दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग ३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकिय विभागास असलेल्या अधिकारात अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-:- अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दिनांक ०४.०४.२०२२,शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक १२, फेब्रुवारी २०२५, शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दिनांक १, एप्रिल २०२४, शासन परिपत्रक अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३ दिनांक २५, जुलै २०२४, मधील सर्व परिच्छेद व परिष्ठातील अटी नुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी आयुक्त, समाज कल्याण ,पुणे यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५०३०४१४१०२१५८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNITA VIRENDRA GAIKWAD

Digitally signed by SUNITA VIRENDRA GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=d31fff582bcd0471a184e5d4bae4b75ca3348053d0eb588b97308bad1ac67a40, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7B3D0DDAE785F68C71F56026F5D7EB976A590FFF12E613DAC6FD709B6C801646, cn=SUNITA VIRENDRA GAIKWAD
Date: 2025.03.04 14:12:46 +05'30'

( सुनिता गायकवाड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई
३. मा. मंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/परिषद, विधानमंडळ, मुंबई
५. मा. राज्यमंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
९. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय.
१२. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग.
१५. सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण विभाग
१६. सर्व संबंधित व्यक्ती / संस्था.
१७. निवडनस्ती (समन्वय).

## प्रपत्र

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | लेखाशिर्ष | पुरस्काराची संख्या | | सद्या अस्तित्वात असलेली पुरस्कार रक्कम (रूपये | | सुधारित पुरस्कार रक्कम (रूपये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व्यक्ती | संस्था | प्रतिव्यक्ती | प्रतिसंस्था | प्रतिव्यक्ती | प्रतिसंस्था |
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार | २२२५-०९९६ | ५१ | १० | १५,००० | २५,००१ | ७५,००० | १,००,००० |
| २ | संत रविदास पुरस्कार | २२२५-०९९६ | ०१ | ०१ | २१,००० | ३०,००१ | ५१,००० | १,००,००० |
| ३ | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार | २२२५-०९९६ | २५ | ०६ | २५,००० | ५०,००० | ५१,००० | १,००,००० |
| ४ | कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार | २२२५-३१२६ | ०१ | ०१ | ५१,००० | ५१,००० | ५१,००० | १,००,००० |

*************************************************************************************